१४ ००(भा-880:17 98) - एमआ

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

परिपत्रक

(11) Annexure- 11.

क्रमांक : एमपीएम/9090 दिनांक 9.1.1998.

विषय : विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट, इगतपुरी या संस्थेच्या "विपश्यना" या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेणा–या महानगरपालिका कर्मचा–यांना परिवर्तीत रजा देणे.

विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा – नाशिक या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्रात "विपश्यना" हे 10 दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. महापालिका आयुक्त यांच्या आदेश क्रमांक : एमजीसी/एफ/7564 दिनांक 31.12.1997 अन्वये, ते प्रशिक्षण घेऊ इच्छिणा–या महापालिका कर्मचा–यांना खाली नमूद केलेल्या शर्तींच्या अधिन राहून परिवर्तीत रजा देण्याचे मंजूर करण्यात आले आहे.

अ). उपरोक्त प्रशिक्षणासाठी संबंधित कर्मचा–याने नजिकच्या विपश्यना केंद्रामध्ये प्रवेश घेतलेला असावा.

ब) प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळविला आहे अशा कर्मचा–यांना, त्यांनी मागणी केल्यास, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता, मुंबई महानगरपालिका (रजा) नियम, 1989 च्या नियम क्र.62(2) अन्वये एका वेळी कमाल 14 दिवसांपर्यंत परिवर्तीत रजा मंजूर करता येईल.

क) कर्मचा–याला तीन वर्षांतून एकदा व संपूर्ण सेवेच्या काळात सहा वेळा परिवर्तीत रजा अनुज्ञेय राहील.

ड) उपरोक्त प्रशिक्षणासाठी महापालिकेतर्फे प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

इ) संबंधित कर्मचा–याने रजेचे आवेदन पत्र प्रशिक्षणाच्या प्रवेश पत्राच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे तसेच, रजेवरुन परत आल्यानंतर प्रशिक्षण पूर्ण केल्याचे संबंधित प्रशिक्षण केंद्राचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

हे आदेश दिनांक 12.1.1998 पासून अंमलात येतील.

सही – 9.1.98
(रत्नाकर गायकवाड)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे).

कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,
कर्मचारी व प्रशासकीय सुधारणा विभाग,
6 वा मजला, विस्तारित इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई – 400 001.

डीपीआर/

क्रमांक : एमपीएम/9090 दि.9.1.98.

प्रत.................................................. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

(सही)
प्रमुख कर्मचारी अधिकारी यांजकरिता.